# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्याबाबत

**(१) २१४३६ (०४-०१-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय गुन्हेविषयक प्रसिध्द झालेल्या सांख्यिकी अहवालानुसार देशात आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ७० टक्के विद्यार्थी राज्यातील असल्याचे तसेच गेल्या काही वर्षांमध्ये आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विद्यार्थ्यांची वाढती आत्महत्या ही चिंताजनक बाब असून सदर आकडेवारीची दखल घेवून राज्यातील विद्यार्थी आत्महत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय गुन्हेविषयक सांख्यिकी अहवाल- २०२२ नुसार राज्यात सन २०२१ मध्ये १८३४ व सन २०२२ मध्ये १७६४ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. सदर आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या संख्येत सन २०२१ च्या तुलनेत सन २०२२ मध्ये एकूण ७० (३.८ टक्के) ने घट झाली आहे.

(२) राज्यातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

(अ) शाळा व महाविद्यालये येथे जाऊन विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते तसेच विविध एनजीओ मार्फत विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात येते.

(आ) तज्ञ मंडळीची मदत घेवून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक भावना निर्माण करण्यात येते.

(इ) कायदेविषयक ज्ञान, रॅगींग, व्यनमुक्ती इत्यादीबाबत विद्यार्थ्यांना जागरुक केले जाते.

(ई) अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास त्याचे मनपरिवर्तन करण्यात येते.

(उ) विद्यार्थ्यांनी तणवमुक्त राहण्याकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते, उदा.स्नेहसंमेलन व सहली इ.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील बंधाऱ्यांच्या झालेल्या दुरवस्थेबाबत

**(२) २२०२५ (०५-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात ३५२ पैकी बहूतांश बंधाऱ्यांची दुरवस्था झाली असून प्रशासनाने सुमारे २५ ते ३० बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे ५ कोटी रुपयांचा निधी मिळावा यासाठी प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या प्रस्तावाला मान्यता देवून बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ३०२ को.प.बंधारे असून त्यापैकी बहुतांशी बंधाऱ्यांना दुरूस्तीची गरज आहे.

कोल्हापूर पाटबंधारे विभाग (उत्तर) कोल्हापूर या विभागाकडून १९ को.प.बंधाऱ्यांच्या दुरूस्तीसाठी रुपये ५.०९ कोटी इतका निधी जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत मंजुरी व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांचेकडे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये प्रस्ताव सादर करणेत आला आहे. तसेच कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण) कोल्हापूर या विभागाकडून ११ को.प. बंधाऱ्यांच्या दुरूस्तीसाठी रुपये ६.७९ कोटी इतका निधी आपत्ती सौम्यीकरणांतर्गत मिळणेसाठी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये प्रस्ताव सादर केला आहे.

(२) उक्त प्रकरणी सदर कामासाठी अद्यापपर्यंत जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांचेकडून प्रशासकीय मान्यता अथवा निधी उपलब्ध झाला नाही. तथापि, सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी वसुलीमधून उपलब्ध झालेल्या निधीमधून तातडीची दुरूस्ती आवश्यक असलेल्या काही को.प.बंधाऱ्यांच्या दुरूस्तीची कामे क्षेत्रिय स्तरावरून हाती घेण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैद्यकीय शिक्षण संचालनालयातील आकृतीबंधातील वाढीव पदे मंजूर करणेबाबत

**(३) २३०३८ (१२-०६-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण व आरोग्य विभाग हे दोन विभाग सन १९७१ मध्ये स्वतंत्र करण्यात आले असून राज्यात केवळ ५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये अस्तित्वात होती, परंतु सन २०२३ मध्ये २५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये अस्तित्वात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात ५ वैद्यकीय महाविद्यालये असताना वैद्यकीय संचालनालयात संचालकासह २०५ पदे मान्य होती व त्यापैकी फक्त १०३ पदे भरण्यात आली होती व आता २५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये असूनही वैद्यकीय संचालनालयात २०३ मंजूर पदांपैकी ७३ पदे भरलेली आहेत तर १३० पदे व संचालकाचे पदही रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर २५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा कार्यभार पाहण्यासाठी संचालनालयातील रिक्त पदे तात्काळ भरावी व सहसंचालक, अतिरिक्त संचालक, उपसंचालक, सहाय्यक संचालक पदासह कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा वाढीव पदाचा आकृतिबंध तात्काळ मंजूर होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.हसन मुश्रीफ (२५-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या खुद्द आस्थापनेवर एकूण मंजूर २०३ पदांपैकी १३६ पदे भरलेली असून ६७ पदे रिक्त आहेत. तसेच संचालकांचे पद रिक्त असून अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.
(३) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे सक्षमीकरण करण्याच्या अनुषंगाने संचालनालयाच्या स्तरावर आवश्यक नसलेली ५० पदे व्यपगत करून ३३ नवीन पदे तसेच क्षेत्रिय स्तरावर २ प्रादेशिक कार्यालये सुरू करण्यासाठी २८ नवीन पदे अशी एकूण ६१ नवीन पदे निर्माण करण्यास शासन निर्णय दिनांक ०६/१०/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) हे पद निर्माण करून त्यांना क्षेत्रिय स्तरावरील विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच क्षेत्रिय स्तरावर २ प्रादेशिक कार्यालये सह संचालक यांच्या अधिपत्याखाली सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही नियमानुसार सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कर्करोग रुग्णालयात पेट सी. टी. स्कॅनची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(४) २३०५६ (२२-०५-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कर्करोग रुग्णालयात उपचारासाठी मराठवाड्यासह विदर्भ, खानदेश व पश्चिम महाराष्ट्रातील व इतर १८ जिल्ह्यातील कर्करोग रुग्ण उपचारार्थ येत असून सदर रुग्णालयात प्रतिदिनी सुमारे ३०० रुग्णांची तपासणी होऊन त्यापैकी ९० टक्के रुग्णांच्या शरीरात आजार

किती प्रमाणात पसरला आहे याचे निदान करण्यासाठी पेट सी.टी. स्कॅन करणे आवश्यक असते, परंतु रुग्णालयात पेट सी.टी. स्कॅनची सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णाची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णाना खाजगी ठिकाणी पेट सी.टी. स्कॅन करणेसाठी रूपये २०,००० इतका खर्च येत असून सदर आर्थिक दुर्बल रुग्णांच्या अडचणीमुळे त्यांना पेट सी.टी. स्कॅन करणे शक्य होत नसल्याने त्यांना आजारावरील उपचारार्थ मुंबई अथवा पुणे या मोठ्या शहरात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालयात पी.पी.पी. तत्वावर पेट सी.टी. स्कॅन सुरु करण्यात येणार असून ग्रामीण भागातील रुग्णांना आर्थिकदृष्टया हे परवडणारे नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे येथील ससून रुग्णालयाच्या धर्तीवर छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कर्करोग रुग्णालयात पेट सी.टी. स्कॅनची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-०६-२०२४) :** (१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर संस्थेस रुग्णहिताच्यादृष्टीने पेट सी.टी.स्कॅनची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा व तालुका न्यायालयातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत

**(५) २३०५९ (२२-०७-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा व तालुका न्यायालयातील लघूलेखक व टंकलेखकांची १६०० पदे रिक्त असून, कार्यरत कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या असल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा व तालुका स्तरावरील न्यायव्यवस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी शासनाने दिनांक ६ फेब्रुवारी, २०२४ रोजी पदनिर्मितीस मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायव्यवस्थेची कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टीने मान्य असलेली पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०२४) :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यातील जिल्हा व तालुका न्यायालयातील लघूलेखक (श्रेणी-३) व कनिष्ठ लिपिकांची माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये एकूण १६०० च्या आसपास पदे रिक्त होती. सदरची रिक्त पदे भरण्यासाठीची भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली असून त्यासाठी दिनांक ०४/१२/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) व (३) होय. शासन निर्णय दिनांक ०६/०२/२०२४ नुसार राज्यातील जिल्हा न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) व दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) या संवर्गातील न्यायिक अधिकाऱ्यांची नवीन २८६३ नियमित पदे, तसेच, त्यांच्यासाठी सहाय्यभूत कर्मचारीवृंदाची ११०६४ नियमित पदे निर्माण करण्यास व ५८०३ मनुष्यबळाच्या मर्यादेत बाह्ययंत्रणेद्वारे टप्प्याटप्प्याने सेवा घेण्यास संबंधित न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून मा.उच्च न्यायालयामार्फत कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बाबरगाव फाटा ते बाबरगाव (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६) २३०६० (२२-०५-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर ते छत्रपती संभाजीनगर (जि.छत्रपती संभाजीनगर) रोडवरील बाबरगांव फाटा (रा.मा.६५) ते बाबरगांव (ग्रामा-८८) हा मुख्य वाहतुकीचा रस्ता ४ कि.मी. लांबीचा असून बाबरगांव परिसरातील १० गावांमधील रहिवाशी या रस्त्यावरुन प्रवास करीत असून सदर रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरणाचे काम १० वर्षापुर्वी करण्यात आले असल्याने रस्त्याची दूरवस्था झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत समाविष्ट करण्यात आला असूनही अद्याप या रस्त्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बाबरगांव फाटा ते बाबरगांव (ग्रामा-८८) या रस्त्याचे काम पूर्ण होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१८-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्य महामार्ग ६५ ते बाबरगाव या ४.०० कि.मी. लांबीच्या रस्त्यास मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रुपये २२८.८६ लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता अदा करण्यात आली असून सदरहू कामाची निविदा दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी प्राप्त झाली आहे. मा.भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक १६ मार्च, २०२४ रोजीच्या आदेशान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ घोषित करण्यात आली, त्यास अनुसरून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने त्यामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही. आचारसंहिता शिथिल झाल्यामुळे लवकरच काम हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीक्षेत्र पंढरपूरचा विकास करण्याबाबत

**(७) २३३५० (१८-०५-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाराणसी येथील काशी विश्वनाथ देवस्थानच्या धर्तीवर श्रीक्षेत्र पंढरपूरचा विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यानुषंगाने पंढरपूर विकास आराखड्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान एक बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बैठकीत कोणत्या सल्लागारांनी पंढरपूर विकास आराखड्यासंदर्भतील सादरीकरण केले व त्यानुषंगाने या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले, या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतची कार्यवाही किती कालावधीत करणार आहे, तसेच याबाबत शासनाची निश्चित भूमिका व धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१३-०८-२०२४) :** (१), (२) व (३) होय.

श्री क्षेत्र पंढरपूरचा विकास करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६/०२/२०२४ रोजी बैठक पार पडली. सदर बैठकीत ३ तांत्रिक सल्लागारांनी सादरीकरण केले होते.

(४) लागू नाही.

---

## राज्यात ९ हजार मेगॉवॅट सौरऊर्जा निर्मिती करण्याबाबत

**(८) २३४८५ (२२-०७-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ९ हजार मेगॉवॅट सौरऊर्जा निर्मिती करण्यात येणार असून त्यामध्ये ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंपामुळे दिवसा वीज पुरवठा करण्याचे शासनाचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सौरकृषी वाहिनी योजनेत शेतकऱ्यांना १.२५ लाख रुपये प्रती हेक्टरी वार्षिक भाडे दिले जाणार असून सदर योजनेची अंमलबजावणी अद्याप करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंपामुळे दिवसा विज पुरवठा करणारी सौरकृषी वाहिनी योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे. शेतकऱ्यांना सौर ऊर्जा वाहिनीद्वारे दिवसा वीज पुरवठा करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० जाहीर केली आहे. या अभियांनातर्गत सुमारे ९२०० मे.वॅ. क्षमतेच्या उभारण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये विकेंद्रित पध्दतीने अंदाजे रुपये ४०,००० कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे.

(२) हे खरे नाही.
(३) शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० दिनांक ०८/०५/२०२३ रोजी जाहीर करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. सदर योजनेंतर्गत एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड (एमएसएपीएल) कंपनीला नोडल एजन्सी म्हणून काम करण्यासाठी नेमणूक करण्यात आली आहे. एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनी मार्फत १२४०० मे.वॅ. क्षमतेकरीता निविदा जाहीर केल्या असून सदर निविदांमध्ये शासकीय जागा व पात्र खाजगी जागा प्रसिध्द करण्यात आल्या. सद्य:स्थितीत या निविदांतर्गत सुमारे ९२०० मे.वॅ. क्षमतेसाठी कार्यादेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील २२ महानगरपालिकांकडे जलसंपदा विभागाचा कोट्यवधी रकमेचा निधी थकित असल्याबाबत

**(९) २३७१२ (२२-०७-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नगर, नाशिक, जळगाव, सोलापुर, मालेगाव यासह २२ महानगरपालिकांकडे जलसंपदा विभागाचे १७३४ कोटी रुपये थकित असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त २२ महानगरपलिकाकडे जलसंपदा विभागाचे थकित रकमेच्या वसूली करुन जलसंपदा विभागास देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सर्व महानगरपालिका यांना शासन स्तरावर देण्यात येणाऱ्या अनुदानातून जलसंपदा विभागाची पाणीपट्टी वसुलीची थकबाकी वळती करणेबाबत मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेस्तरावर दिनांक ०३/०४/२०२४ रोजी बैठक आयोजित करुन नगरविकास विभागास शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून सदर थकीत पाणीपट्टी भरण्याकरीता आवश्यक सूचना मुख्य सचिवांमार्फत देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पाठपुरावा सुरु आहे.
तसेच सर्वाधिक थकीत पाणीपट्टी असलेल्या पुणे महानगरपालिकेस व इतर सर्व थकबाकी असलेल्या विभागांच्या प्रमुखांना अर्धशासकीय पत्राद्वारे थकीत पाणीपट्टी जमा करणेबाबत सूचित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महात्मा फुले जन आरोग्य योजना राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(१०) २३७५१ (१२-०६-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील ९९९ रुग्णालयांचा समावेश असला तरी राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये या योजनेंतर्गत मोफत उपचार होणारे एकही रुग्णालय नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेमध्ये काही आजारांवरील उपचार व शस्त्रक्रिया जिल्हा शासकीय रुग्णालयात करण्यात येतात, परंतु ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना जिल्हा रुग्णालयांमध्ये जाणे शक्य होत नसल्यामुळे जिल्हा शासकीय रुग्णालयातील राखीव आजार योजनेतील समाविष्ट सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये देखील लागू करावेत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये या योजनेंतर्गत मोफत उपचार होणारे रुग्णालय असावे यासाठी आणखी ५०० रुग्णालयांचा योजनेत समावेश करावा, योजनेत समाविष्ट रुग्णालयांच्या दरात सुधारणा करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२६-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील एकूण ३५८ तालुक्यांपैकी या योजनेंतर्गत एकही रुग्णालय कार्यरत नसलेले १३७ तालुके आहेत.
(२), (३) व (४) यासंदर्भात मा.लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झालेले नाही, तथापि, मा.लोकप्रतिनिधींच्या सदर मागणीची उचित नोंद घेतली असून या बाबत संबंधितांना सूचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी सिंचन, घरगुती व औद्योगिक प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठी ठोक जल दराचे पुनर्विलोकन व सुधारणा करण्याबाबत

**(११) २३८७२ (२२-०७-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी सिंचन घरगुती व औद्योगिक प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठी ठोक जल दराचे पुनर्विलोकन व सुधारणा करण्यासंदर्भात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास परिपत्रक प्रसिध्द केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिपत्रकानुसार खाजगी उपसिंचन योजनेकरीता क्षेत्रधारकाला जलदर प्रवाही सिंचनाच्या दरानुसार आकारणी करण्याबाबत माहे जून, २०२५ पर्यंत सवलत देण्यात आली असून स्वखर्चाने पाईपलाईन टाकून खाजगी उपसा सिंचनाचा वापर करणाऱ्यांना घनमापन मीटर पध्दतीने जल दर लागू करणे अन्यायकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी उपसासिंचन योजना राबविण्याऱ्या शेतकऱ्यांना यामधून वगळण्यात येऊन पूर्वीप्रमाणे जल दर आकारणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०२४) :** (१) होय.

(२) व (३) खाजगी उपसा सिंचन योजनेमध्ये पाणी उपसा करण्यापासून ते शेतापर्यंतची पायाभूत सुविधा व सामग्री ही त्यांची वैयक्तिक खाजगी स्वरुपाची असल्याने प्रवाही सिंचनासाठीचे दर खाजगी उपसा सिंचन योजनेसाठी लागू केल्याने याबाबत खाजगी उपसा सिंचन लाभार्थ्यांमध्ये असंतोष आहे.

मा.लोकप्रतिनिधी, खाजगी उपसा सिंचन संस्थांकडून केली जाणारी विनंती व लोकभावना विचारात घेऊन, खाजगी उपसा सिंचन योजना पाणीपट्टी आकारणी व वसुली अंमलबजावणीच्या विविध अडचणी दूर करण्यासाठी खाजगी उपसा सिंचन योजनाकरीता स्वतंत्र क्षेत्राधारित दर देण्याची बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन आहे. मात्र तोपर्यंत खाजगी उपसा सिंचन लाभार्थ्यांना दिलासा म्हणून शासनाने दिनांक २६/०६/२०२४ च्या पत्रान्वये, खाजगी उपसा सिंचन योजनेचे दर प्रवाही सिंचन योजनेच्या दराच्या अनुज्ञेय दराच्या अनुषंगाने आकारण्यास सद्य:स्थितीत स्थगिती दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पातुर (जि.अकोला) तालुक्यातील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत बांधलेली शौचालये पाणीपुरवठा अभावी बंद असल्याबाबत

**(१२) २३९१५ (१७-०६-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातुर (जि.अकोला) तालुक्यामध्ये स्वच्छ भारत मिशन अंतर्गत तसेच पंधराव्या वित्त आयोगाच्या व मनरेगाच्या माध्यमातून बांधण्यात आलेली ५९ सार्वजनिक शौचालयाना पाण्याची सुविधा उपलब्ध होऊ न शकल्याने सदरील शौचालये बंद असून ५७ ग्रामपंचायतीपैकी १३ गावांत ग्रामपंचायतीच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याची सुविधा उपलब्ध असल्याने येथील सार्वजनिक शौचालये सुरु असून उर्वरित गावांत ही योजना कार्यान्वित न झाल्याने एका शौचालयाकरीता शासनाने रुपये ४ लाख इतका केलेला खर्च वाया जात असून येथील ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सार्वजनिक शौचालयांना पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०१-०७-२०२४) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत सार्वजनिक शौचालयाकरीता रुपये ३.०० लक्ष (रुपये २,१०,०००/- स्व.भा.मि (ग्रा) व रुपये ९०,०००/- १५वा वित्त आयोग) इतका निधी अनुज्ञेय आहे. ता.पातुर, जि.अकोला येथे एकूण ५९ सार्वजनिक शौचालये मंजूर असून, त्यापैकी ५२ सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले असून, ७ सार्वजनिक शौचालयांचे काम सूरू आहे.

बांधकाम पूर्ण केलेल्या ५२ सार्वजनिक शौचालयांपैकी, ३७ सार्वजनिक शौचालयांना पाण्याची सुविधा उपलब्ध आहे व उर्वरित १५ सार्वजनिक शौचालयांना पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता संबंधित ग्रामपंचायतींना जिल्हा परिषद स्तरावरून सूचना देण्यात आल्या आहेत, त्यानुसार नळ जोडणीचे काम प्रगतीपथावर आहे.

---

## खांबोरा प्रादेशिक पाणीपुरवठा (जि.अकोला) योजनेंतर्गत गावांना अनियमित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१३) २३९१६ (१८-०६-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खांबोरा (ता.जि.अकोला) येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत येणाऱ्या नवथळ, खेकडी, पारितवाडा, आगर, पाळोदी, गोत्रा व कंचनपूर आदि गावांना आठवडाभरातून एकदा पाणीपुरवठा केला जात असून सहा महिनांपासून पाणीपुरवठा बंद असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरीकांना टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत असून टँकरद्वारे मिळणारे पाणी हे अनियमित व दूषित, खारे असल्याने ग्रामस्थांना अनेक लहान मोठ्या आजारांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पाणीटंचाई दूर करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०५-०७-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. माहे एप्रिल व मे महिन्यामध्ये अवकाळी वारा व पाऊस झाल्यामुळे तसेच खांबोरा हेडवर्क्स जवळ मोठे लिकेज झाल्यामुळे पाणीपुरवठा करण्यास विलंब झालेला आहे.

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

उन्हाळ्यामध्ये योजनेमधील समाविष्ट गावांकडून अन्य उपाययोजना तथा टँकर्सची कोणत्याही प्रकारची मागणी करण्यात आली नसल्याने संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्यात योजनेमधील गावांचा समावेश करण्यात आला नाही. सदर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमधुन नियमीत पाणीपुरवठा करण्यासाठी, योजनेचे जल जीवन मिशन अंतर्गत रेट्रोफीटींगचे काम प्रगतीपथावर असून, जवळपास ७५% काम पूर्ण झाले आहे. योजनेचे काम पूर्ण झाल्यावर समाविष्ट गावांना नियमीत पाणीपुरवठा होऊ शकेल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोकणातील आठ समुद्र किनाऱ्यावरील आनंद कुट्या प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत

**(१४) २३९१८ (१७-०६-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कोकणातील चार जिल्ह्यातील आठ समुद्र किनाऱ्यावरील पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी गोव्याच्या धर्तीवर कोकणातील समुद्रकिनाऱ्यावर आनंदकुट्या (बीच शॅक्स) प्रकल्प प्रायोगिक तत्वावर राबविण्याचा निर्णय शासनाने सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून गत तीन वर्षापासून सदर प्रकल्पाची अंमलबजावणी न झाल्यामुळे शासनाच्या पर्यटन वाढीचा हेतू सफल झाला नसल्याचे दिनांक २ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्सोली व दिवेआगार (जि.रायगड) या दोन समुद्र किनारी शासनाच्या जागा भाड्याने देऊन सुरुवातीला सदर पायलट प्रोजेक्ट राबविला जाणार होता, परंतु गत तीन वर्षे होऊनही त्यास चालना मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०३-०७-२०२४) :** (१) कोकणातील ४ जिल्ह्यातील ८ समुद्रकिनारी चौपाटी क्षेत्रावरील निश्चित केलेल्या स्थानांवर चौपाटी कुटी उभारण्याचे धोरण राबविण्यास शासनाने दिनांक १७/०८/२०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.
(२), (३) व (४) बीच शॅक्स प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड व मौ.दिवे आगार, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील जागेची निवड करण्यात आली. सहायक संचालक, नगररचना, रायगड अलिबाग यांनी दिनांक २६/०४/२०२२ रोजी मौ.वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सर्वे नं.हि.नं.६-१ अ (संपूर्ण) मंजूर मुंबई महानगर प्रादेशिक योजनेनूसार "वन वापर" विभागामध्ये समाविष्ट असल्यामुळे प्रस्तावित बिच शॅक्स व इतर बांधकाम अनुज्ञेय होणार नसल्याबाबत कळविले आहे.

मौ. दिवेआगार, ता.श्रीवर्धन येथील स.नं.७९६ प्रस्तावित बिच शॅक्स व इतर बांधकाम CRZ बाधित क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्रामध्ये अनुज्ञेय असून, याबाबत महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांची मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील वृक्षतोड निर्णय रद्द करण्याबाबत

**(१५) २३९५४ (१८-०६-२०२४) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीमधील पावणे येथील रासायनिक उद्योग पट्ट्यामध्ये प्रदूषण रोखण्यासाठी खाजगी कंपनीमार्फत भूखंड क्र. ७ वर लावण्यात आलेले २०० वृक्ष एम.आय.डी.सी कडून प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप करण्यासाठी तोडण्याचा निर्णय घेतल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर औद्योगिक पट्ट्यामध्ये अनेक रासायनिक व पेट्रोलियम पदार्थांच्या कंपन्या असल्यामुळे येथे नागरी वसाहत उभारण्यात आल्यास प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त हरित पट्ट्यातील झाडे तोडण्याचा निर्णय घेण्यात आल्याने पर्यावरणवादी संस्थांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी तक्रार करुन वृक्षतोड थांबविण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नवी मुंबईतील शहरी भागात प्रकल्पग्रस्तांना चांगल्या ठिकाणी भूखंड उपलब्ध करुन त्यांचे पुनर्वसन करुन सदर भूखंडावरील झाडे तोडण्याबाबतचा एम.आय.डी.सी. प्रशासनाकडून घेतलेला निर्णय रद्द होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२८-०६-२०२४) :** (१) "एमआयडीसीच्या ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील पावणे येथील एकमेव मोकळया जागेतील तब्बल २०० झाडे प्रकल्पग्रस्तांच्या भूखंड तयार करण्यासाठी तोडण्यात येणार असल्याने त्यास पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली असून, पर्यावरणवाद्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार केली आहे "अशा आशयाची बातमी दै. नवशक्ती वृत्तपत्रामध्ये दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी प्रकाशित झाली होती.

(२), (३) व (४) भूखंड क्र.ओएस-७ मध्ये, भूखंड क्र. पीएपी-सी-१२९ या ३००.०० चौ.मी.भूखंडाचे आरेखन करुन वाटप केले आहे. वरील बातमीच्या अनुषंगाने भूखंड क्र. पीएपी-सी-१२९ ची मऔवि महामंडळाच्या प्रतिनिधींनी पाहणी केली असता सदरील भूखंडावरील कोणत्याही प्रकारची झाडे तोडण्यात आलेली नसल्याचे दिसून आले आहे.

वरील बातमी प्रसिध्द होण्यापूर्वी भूखंड क्र.पीएपी-सी-१२९ ची पाहणी करुन भूखंडावर असणाऱ्या वृक्ष/झाडे यांचे संख्येबद्दल व विनापरवानगी न तोडणेबाबत मऔवि महामंडळामार्फत दिनांक २८/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये भूखंडधारकास सुचित करण्यात आले आहे.

तसेच सदर भूखंडावरील प्रकल्पग्रस्तांच्या भूखंडाकरीता २०० झाडे तोडण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव मऔवि महामंडळास प्राप्त झाला नसून, वृक्ष तोडणेबाबत कुठलीही बाब मऔवि महामंडळाकडे प्रस्तावित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रँटरोड, मुंबई येथील संक्रमण शिबीरातील रहिवाशांचे भाडे विकासकाने थकविले असल्याबाबत

**(१६) २३९६० (३०-०६-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रँट रोड, मुंबई येथील शितल इस्टेट, गुरुनानक मार्केट तसेच दादर पश्चिम भवानी शंकर रोड वरील सिद्धी चाळ येथील रहिवाशांचे संक्रमण शिबीराचे भाडे विकासकाने थकविले असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासक गुरुनानक मार्केट मधील रहिवाशांना त्रास देऊन जागा रिक्त करण्यासाठी तगादा लावत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली असून विकासकाने माहे जून, २०२१ पासून ते आजतागायत शितल इस्टेट येथील इमारतीच्या पुनर्विकासाचे कामास विलंब केला व त्यावर बृहन्मुंबई इमारत आणि दुरुस्ती मंडळाने दिनांक ०२ डिसेंबर, २०२२ पर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रहिवाशांनी केलेल्या तक्रारी संदर्भात बृहन्मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुर्नरचना मंडळाने सुनावणी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रहिवाशांचे संक्रमण शिबीराचे भाडे मिळण्याबाबत तसेच बृहन्मुंबई इमारत आणि दुरुस्ती मंडळावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०३-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) काही रहिवाशांचे पुनर्विकासास असलेले असहकार्य तसेच मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिकांमुळे पुनर्विकासास विलंब झाल्याचे दिसून येते. नगरविकास विभागाच्या मान्यतेने मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे ३३(९) अंतर्गत समुह पध्दतीने पुनर्विकासामध्ये रुपांतर करण्याबाबत दिनांक ०१/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: मंजूरी दिली आहे.

(३) ग्रॅटरोड मुंबई येथील शितल इस्टेट, गुरुनानक मार्केट या इमारतीमध्ये ४ भाडेकरु / रहिवाशांनी दिनांक ०२/११/२०२३ व दिनांक ०४/०४/२०२४ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विकासकाने दिनांक २१/०६/२०२४ रोजी मंडळास खुलासा सादर केला आहे. सदर खुलाशाच्या अनुषंगाने म्हाडामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) मुंबई ग्रॅटरोड येथील प्रथम टप्प्यात तोडण्यात आलेल्या इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी यांना नियमित भाडे अदा करण्यात येत आहे. कोरोना साथीचा काळ वगळता बहुतांश भाडेकरूंना नियमित भाडेवितरण करण्यात येत आहे.

तसेच दादर पश्चिम येथील भवानी शंकर मार्गावरील सिध्दी चाळ, सिताराम चाळ व अमृत चाळ येथील बहुतांश भाडेकरुंना भाडे अदा करण्यात आले असून उर्वरीत भाडेकरुंनी थकीत भाड्यासाठी विकासका विरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य दंतवैद्यक परिषद आणि संयुक्त दंतवैद्यक परिषदांची स्थापना करण्याबाबत

**(१७) २४००० (२०-०७-२०२४) श्री.राजहंस सिंह, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या धर्तीवर राष्ट्रीय दंत आयोग तयार करण्यात आला असून राज्यात त्याची अंमलबजावणी करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेली भारतीय दंत परिषद (डेंटल कौन्सिल ऑफ इंडिया) रद्द करण्यात आली असून त्या जागी राष्ट्रीय दंत आयोगामार्फत काम करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात उक्त कायदा लागू झाल्यापासून राज्य दंतवैद्यक परिषद आणि संयुक्त दंतवैद्यक परिषदांची स्थापना करणे अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.हसन मुश्रीफ (०४-०९-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे. राष्ट्रीय दंत आयोग अधिनियम, २०२३ मधील कलम २९ नुसार राज्यात राज्य दंत परिषद स्थापन करणे आवश्यक आहे. तथापि, उक्त अधिनियमातील कलम २९ च्या पोटकलम (७) मध्ये दोन किंवा अधिक राज्ये कराराद्वारे एकत्र येऊन संयुक्त राज्य दंत परिषद स्थापन करू शकतात. तथापि, संयुक्त दंतवैद्यक परिषद स्थापन करणे अनिवार्य नाही.
(४) सदर अधिनियमाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने विभागाच्या दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीमार्फत उक्त अधिनियमाच्या कलम २९ व कलम ४८ मधील तरतूदी विचारात घेऊन नियमांचा मसुदा तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या कचरा कुंडीच्या साहित्य खरेदीच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१८) २४००८ (१७-०६-२०२४) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून कचरा कुंडीच्या संदर्भातील साहित्य खरेदी करण्याची निविदा माहिती तंत्रज्ञान विभागाच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या कंपन्यांना देण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग घेणाऱ्या कंपन्यांपैकी मिनिटेक सिस्टीम इंडिया प्रा.लि.नाशिक व नाईस कॉम्प्युटर, नाशिक या कंपन्या एकाच व्यक्तीच्या नावे असून या तीनही कंपन्याच्या जी.एस.टी. नोंदणी कार्यालयाचा पत्ता देखील एकाच इमारतीत असल्याची नोंद आहे, तसेच इंडूसपार्क इंटरनॅशनल प्रा.लि., मुंबई, ऐज्युस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि., मुंबई व श्री.व्यंकटेश पॉली मोल्ड या तीन कंपन्यांचा आर्थिक व्यवहार सांभाळणारी व्यक्ती एकच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंपन्यांनी शासनाच्या इतर विभागामध्येसुध्दा संगणक टॅब व इतर साहित्य खरेदी प्रक्रियेमध्ये सहभाग घेतलेला असून विभागाचे अधिकारी व कंपनीच्या अधिकाऱ्यांशी असलेल्या आर्थिक संगनमतामुळे या पाच कंपन्यांपैकी एका कंपनीला निविदा मिळण्यासाठी निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्यात आल्याने यामध्ये शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने निविदा प्रक्रियेची चौकशी विशेष तपास पथकामार्फत करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मुख्य सचिवांकडे दिनांक १ मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पाच कंपन्यांपैकी एका पात्र झालेल्या कंपनीला निविदा देण्यात येत असून पात्र झालेली कंपनी एकत्र पध्दतीमुळे (Cartel system) इतर कंपन्यांकडून साहित्य खरेदी करुन त्यातुन मिळालेला नफा हा इतर सहभाग घेतलेल्या कंपन्यांच्या बँकेच्या खात्यावर हस्तांतरित करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्याअनुषंगाने सदर निविदा प्रक्रियेमध्ये शासनाच्या अटी व शर्तींमध्ये कंपनीला निविदा मिळण्यासाठी बदल करण्यात आल्याने सदर निविदा रद्द करुन या कंपन्यांना काळया यादीत समावेश करुन दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

मात्र, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कचरा कुंडी निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ०१ मार्च, २०२४ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

कचरा कुंडी निविदा प्रक्रिया ही दर करार निश्चित करण्याच्या अनुषंगाने संपूर्णत: शासनाच्या "जेम पोर्टल" वरून पारदर्शकपणे राबविण्यात आली आहे. निविदेतील अटी व शर्तीनुसार कचरा कुंडी निविदा प्रक्रियेमध्ये, कचरा कुंडी उत्पादक किंवा उत्पादक कंपन्यांचे अधिकृत पुरवठादार सहभाग घेवू शकतात.
(२) नाईस कॉम्प्युटर, नाशिक या संस्थेने निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतलेला नसून, मिनिटेक सिस्टीम इंडीया प्रा. लि. नाशिक याच कंपनीने निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग घेतल्याने, दोन्ही कंपन्याचे कार्यालय व जी.एस.टी. नोंदणी कार्यालय एकाच इमारतीमध्ये आहेत किंवा कसे, याबाबत या विभागाकडे माहिती उपलब्ध असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच, इंडूसपार्क इंटरनॅशनल प्रा.लि., मुंबई, या नावाच्या संस्थेने/कंपनीने निविदा प्रक्रियेत सहभाग घेतलेला नाही.

तथापि, या विभागांतर्गतच्या निविदा प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या एज्यूस्पार्क इंटरनॅशनल प्रा. लि., मुंबई व श्री.व्यंकटेश पॉली मोल्ड, छत्रपती संभाजीनगर या संस्थांचे जी.एस.टी. नंबर, पत्ता, मालक/डायरेक्टर इत्यादी हे सर्व वेगवेगळे आहेत.
(३), (४) व (५) लोकप्रतिनिधींनी दिनांक ०१ मार्च, २०२४ च्या सुमारास मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे कचरा कुंड्याबाबत करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी केलेली होती, हे खरे आहे.

कचरा कुंडी निविदा प्रक्रिया ही दर करार निश्चित करण्यासाठी करण्यात आलेली असून, राज्यस्तरावरून खरेदीची कोणतीही प्रक्रिया होणार नाही. प्रस्तूत निविदा प्रक्रिया संपूर्णत: शासनाच्या "जेम पोर्टल" वरून करण्यात आलेली आहे. तसेच १० लि. कचरा कुंडी निविदेत एकूण १२ निविदाधारक सहभागी झालेले होते, त्यापैकी ५ निविदाधारक पात्र ठरले होते व ८० लि. कचरा कुंडी निविदा प्रक्रियेत एकूण ११ निविदाधारकांपैकी ५ निविदाधारक पात्र ठरलेले होते. यामुळे, व्यापक स्पर्धा झालेली असून, कोणत्याही विशिष्ठ कंपन्याना निविदा मिळण्याच्यादृष्टीने अटी व शर्ती ठेवण्यात आल्या नसल्याचे स्पष्ट होते.

तसेच निविदेमधील अटी शर्तींचा समावेश करताना केंद्र शासनाच्या General Finance Rule २०१७, Manual of procurement of Goods व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ मधील निर्देशांचे पालन करण्यात आले आहे. त्यामुळे कोणत्याही पात्र कंत्राटदारास कामापासून वंचित ठेवले नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे निविदा प्रक्रियेची चौकशी विशेष तपास पथकामार्फत करण्याची आवश्यकता नाही.

सबब, कंपन्यांना काळ्या यादीत टाकणे वा अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयात डायलिसीस केंद्रे उभारण्याबाबत

**(१९) २४०४२ (१८-०६-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील येणाऱ्या पॅथॉलॉजीच्या चाचण्यापासून ते एक्सरे, सिटीस्कॅन, एमआरआय, रुग्णवाहिका व सफाईच्या कामाचे खाजगीकरण झाले असून सध्या पब्लिक प्रायव्हेट पार्टनर शिफ्टच्या (पीपीई) धर्तीवर राज्यातील ३६७ ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयात १ हजार ९५० बेडचे डायलिसिस केंद्र उभारली जाणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात एचएलएल लाईफ केअर लिमिटेड यांच्याकडून याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात येत असून अहवालाप्रमाणे आरोग्य विभागाचे खाजगीकरण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आरोग्य विभागाचे खाजगीकरण न करता शासनामार्फत ही ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये चालविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२९-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
रुग्णालयांचे खाजगीकरण करण्यात येणार नसून सेवा या पब्लिक प्राव्हेट पार्टनरशिप मध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखाली असून शासनामार्फत चालविली जातात तसेच सदर रुग्णालये खाजगी संस्थांमार्फत चालविण्याबाबत प्रस्तावित नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जलसंपदा विभागाच्या प्रलंबित प्रकल्पाना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) २४०८१ (२२-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक वर्षापासून निधी अभावी जलसंपदा विभागाचे प्रकल्प प्रलंबित असून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने १५००० कोटी रुपयाचा निधी मंजूर केला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पहिल्या टप्प्यात ७५ अपूर्ण सिंचनाचे प्रकल्प तसेच १५५ वितरण प्रणाली कालवे याची कामे पूर्ण करण्यात येणार असून त्यासाठी ही साडेसात हजार कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सिंचनाचे सर्व प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण होणार आहेत व उर्वरीत निधी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०२४) :** (१) होय, अंशतः खरे आहे. प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने रुपये १५००० कोटी रकमेचा निधी NABARD मार्फत कर्ज स्वरूपात घेण्याचे ठरविले आहे.
(२) जलसंपदा विभांतर्गत ७५ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे व १५५ पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करणेसाठी रुपये १५००० कोटींपैकी प्रथम टप्प्यातील रुपये ७५०० कोटीचे दीर्घ मुदतीचे कर्ज नाबार्ड कडून घेण्याबाबत दिनांक ११/०३/२०२४ रोजी मा.मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे व दिनांक १४/०३/२०२४ रोजी त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(३) राज्यातील प्रथम टप्प्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प २ वर्षांमध्ये जलदगतीने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी नाबार्डकडून प्रथम टप्प्यांतर्गत प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य उपलब्ध होण्यासाठी आवश्यक कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.